महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सहावी

---

# समजपूर्वक वाचन

**अर्ज**

प्रति

मा. मुख्याध्यापक,

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रुईखेड,

ता.आकोट.

विषय :- दोन दिवस अनुपस्थित राहण्याची परवानगी मिळणेबाबत

अर्जदार :- रूपाली गजानन सोलकर

महोदय,

सर माझी आई आजारी आहे. तिची काळजी घेण्याकरिता घरी कोणीच नसल्यामुळे मी पुढील दोन दिवस शाळेत येऊ शकत नाही. या कालावधीत राहिलेला माझा अभ्यास वर्गमित्र व वर्गशिक्षकांच्या मदतीने पूर्ण करेन.

तरी कृपया मला दोन दिवस शाळेत अनुपस्थित राहण्याची परवानगी द्या.

आपली विद्यार्थिनी

रूपाली ग. सोलकर

**प्रश्न :-**

१) अर्जाचा विषय कोणता?

२) अर्ज कोणी केला आहे?

३) रूपाली का अनुपस्थित राहणार आहे?

४) परवानगी कोणाकडे मागितली आहे?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सहावी

---

**गणिती भाषा**

खडकेश्वर येथे दर शुक्रवारी जनावराचा बाजार भरतो. खेड्यापाड्यातून अनेक लोक खरेदीविक्रीसाठी येतात.

काहीजण या व्यवहारात थोडासा मोबदला घेऊन मदत करतात. जनावरे बाजारात दाखल झाली की ग्रामपंचायतीमार्फत पावती देऊन गणनानोंद केली जाते. आजच्या बाजारी तीनशे पन्नास बैलजोडी, पाचशे शेळ्या, दोनशे गायी अशी खरेदीविक्री झाली. बैलाची किंमत साधारणपणे पंधरा हजार ते पस्तीस हजार पर्यंत गेली. देशी गायीची किंमत संकरित गायीपेक्षा सात हजारांनी जास्त होती. रामजीने देशी गाय बावीस हजाराला घेतली. प्रत्येक जनावराची नोंदणी फी पाच रुपये होती. कासीमला हॉटेलच्या व्यवसायातून बाजारला दोन हजार रुपये नफा मिळतो.

**प्रश्न :-**

१) या बाजाराला एकूण किती बैल आणले?

२) खडकेश्वरच्या बाजारात सर्व मिळून जनावरे किती आली?

३) पंधरा हजार रुपयेप्रमाणे बैल घेतल्यास जोडीची किंमत किती होईल?

४) रामजीने संकरित गाय घेतली असती तर किती रुपयाला मिळाली असती?

५) ग्रामपंचायतीला नोंदणी फीचे एकूण किती रुपये मिळाले?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : सहावी

---

**पत्र**

ज्ञानेश्वर पांडे
घर क्र. ६९९२
सज्जन निवास,
सदर बाजार,
सातारा.
१५/०२/२०१६

प्रिय मित्र रमेश यास,

स. न.

तुझे पत्र मिळाले वाचून आनंद झाला. मनाने तुला भेटल्यासारखेच वाटले.

मित्रा, परवाच मी सहलीहून परतलो. तू सोबत असायला हवा होतास असे राहून राहून वाटत होते.

जवळच्या किल्ल्यावर सहल गेली होती. आम्ही तेथेच मुक्काम केला. किल्ल्याचे दगडी बांधकाम पाहून आम्ही अवाक झालो! बुरुजावरून खालचा परिसर मनोहर दिसत होता. भव्य तटबंदी पाहताना मनात विचार आला, ‘हे काम त्यावेळी कसे बरे केले असेल!’

रात्री आम्ही झाडाखाली जेवलो. सुंदर चंद्रप्रकाशात परिसर उजळून निघाला होता!

दुसऱ्या दिवशी परतताना किल्ल्याची चित्रे डोळ्यासमोर तरळत होती.

पुढच्या सहलीला तू नक्की ये. तुझ्या घरच्या मोठ्यांना नमस्कार सांग, पिंटूला आठवण सांग.

तुझा,
नरेश

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सहावी

---

**प्रश्न :-**

१) पत्र कोणी कोणास लिहिले आहे?

२) नरेश अवाक् का झाला?

३) नरेशच्या मनात राहून राहून कोणती गोष्ट येत होती?

४) रात्री परिसर उजळून का निघाला होता?

५) अवाक् होण या वाक्प्रचाराचा अर्थ लिही.

६) किल्ल्याची तटबंदी पाहताना नरेशच्या मनात कोणता विचार आला?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद
(विद्या परिषद)
इयत्ता : सहावी

---

**प्रतिसाद**

**स्वच्छता हा नागरिकांचा हक्क**

स्वच्छतागृह उपलब्ध असणे हा नागरिकांचा हक्क आहे परंतु रस्त्यांवर आरोग्यकोठ्या व शौचालये बांधताना वाहतुकीला अडचण होणार नाही, याचीसुद्धा खबरदारी घेतली पाहिजे. तसेच स्थानिक नागरिकांना आरोग्य कोठ्यामुळे दुर्गंधी व कचऱ्यामुळे आरोग्यास हानी होणार नाही याचीसुद्धा दक्षता घेतली पाहिजे, असे न होता फक्त लोकप्रतिनिधींचा निधी संपवण्यासाठी शौचालये व आरोग्यकोठ्या रस्त्यांवर बांधणे म्हणजे नागरिकांच्या पैशाचा अपव्यय आहे.

सौ. मीना पाटील
चंद्रपूर

**प्रश्न :-**

१) रस्त्यांवर आरोग्यकोठ्या व शौचालये बांधताना कोणती खबरदारी घेतली पाहिजे?
२) पैशाचा अपव्यय होऊ नये म्हणून लोकप्रतिनिधींनी कोणती काळजी घ्यावी?
३) स्वछतागृहांमुळे नागरिकांना कोणता त्रास सोसावा लागतो?
४) वरील प्रतिसाद कोणी मांडला आहे?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सहावी

---

**विनोदी लेखन**

संदर्भ :- चिं. वि. जोशींचे निवडक विनोद

**मोटार प्रवास**

चिमणराव आपल्या मोटारीतून ऑफिसला जात असत. या प्रवासाचा हा एक अनुभव: " मी मोठ्या अभिमानाने सहकाऱ्यांना घेऊन ऑफिसला निघालो. कंपाऊंडात शिरलो; पण मोटार आज थांबण्याचे मनावर घेईना. काही केल्या इंजिन बंद होईना. पायब्रेक दाबला, हातब्रेक दाबला. वेग कमी केला, पण व्यर्थ! औटच्या फाटकातून बाहेर आणि इनच्या फाटकातून आत, असे करीत आम्ही गरगर फिरत होतो. ऑफिसच्या नोकराची आणि बघ्यांची पोर्चमध्ये गर्दी जमली. पेट्रोल संपले की गाडी थांबेल असा मला विश्वास होता ; पण त्यासाठी तीन तास थांबावे लागले असते. अखेर दिल्लीच्या साहेबांची ' ग्लोरीयान ट्रेन ' आमच्या फाटकातून आत शिरताना माझ्या मोटारीने तिच्या पार्श्वभागावर धडक दिली आणि थांबली. या अपघातात माझ्या मोटारीचे नाक चांगलेच सडकले. माझ्या कपाळाला टेंगुळ आले, अय्यरसाहेबांचा चष्मा फुटला आणि त्या दोघा कारकुनांच्या हिरड्या सुजल्या."

**प्रश्न :-**

१) चिमणराव ऑफिसला कसे जात?

२) ऑफिसच्या पोर्चमध्ये बघ्यांची गर्दी का जमली होती?

३) दिल्लीच्या साहेबांची कोणती गाडी फाटकातून आत शिरली?

४) मोटारीच्या धडकेने कोणकोणत्या गोष्टी घडल्या?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सहावी

---

**बातमी**

**सरदवाडी धरणयोजनेला प्रारंभ**

**सिन्नरला पाणी पुरवठा**

सिन्नर दि. २६ (वार्ताहर) – सिन्नर शहराची पाणीटंचाई कायमची दूर करण्यासाठी सिन्नरजवळील सरदवाडी धरणयोजना कार्यान्वित करण्याचा निर्णय यापूर्वीच शासनाने घेतला होता. आता या धरणाच्या प्राथमिक कामकाजास प्रारंभ झाला असल्याचे समजते. ही धरणयोजना सुमारे अठरा लाख रुपये खर्चाची असून या योजनेसाठी सिन्नर नगरपालिका सुमारे नऊ लाख रुपये खर्च करणार आहे. गेल्या अनेक वर्षांपासून या धरण योजनेची मागणी सिन्नर पालिकेने केली होती व या धरणाविषयी उलटसुलट वार्ताही उठविल्या जात होत्या. परंतु सिन्नर पालिकेने या धरणाच्या मागणीचा अखेरपर्यंत पाठपुरावा केल्याने आता या धरणाच्या कामास गती मिळाली असल्याचे समजते.

**नवीन शब्द** :– योजना कार्यान्वित करणे - योजनेप्रमाणे काम सुरु करणे,
गती - वेग

**प्रश्न :-**

१) वरील बातमी कशाविषयी आहे ?

२) धरण का बांधले जाणार आहे ?

३) धरणाच्या कामास गती मिळाली ह्याचे कारण काय आहे ?

४) धरणयोजनेला एकूण किती खर्च येईल असा अंदाज आहे ?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सहावी

---

**संवाद**

संदर्भ :- प्रतिभेच्या प्रांतातील प्रवास

लेखक / कवी :- अशोक निरफराके

" माफ करा हं ;  पण येथे एखादा पोलीस दिसला का तुम्हाला ? आणि आसपास कुठे पोलीस चौकी तरी आहे का ? "

" चौकी तर खूपच दूर आहे आणि पोलीस कधी इकडे येतच नाही "

" असं का! मग मुकाट्याने पैशाचे पाकिट काढा पाहू!"

**प्रश्न -**

१) पोलिसांबद्दल चौकशी कोण करत होते?

२) ही चौकशी करण्यामागे त्याचा काय हेतू होता?

**सूचना फलक**

प्राथमिक आरोग्य केंद्र

१. ग्रामीण नागरिकांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र २४ तास खुले राहील.
२. येथे १८ वर्षा पर्यंतच्या बालकांचे लसीकरण केले जाते.
३. कुत्रा  चावणे, सर्पदंश माधामाशांचा चावा इत्यादीं वर येथे ल,स उपलब्ध आहे.
४. डांगया खोकला,घटसर्प हिवताप अशा संसर्गजन्य आजारांवर उपचार केले जाते.
५. येथे गर्भवती स्त्रियांची तपासणी केली जाते आणि आरोग्य सल्ला दिला जातो.
६. सांडपाणी व्यवस्थापन,डास निर्मुलन उपचार गप्पिमासे देणे, पेयजल शुध्दतेसाठी जीवन इत्यादी अरोग्य पूरक कामे प्राथमिक आरोग्य केद्रामार्फत केली जातात.

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कामाचा सूचना फलक तू वाचला आहेस. यावर आधारित पाच प्रश्न तू तयार करून लिही.

---

**अनुभव**

वरच्या गच्चीवर चारपाच जणांचा “चीर चीर घोडी” हा खेळ रंगला होता. “हेS” सगळे ओरडले, “पुन्हा अजय्वारच राज्य!” असे दोन तीन वेळा झाले. अजय रडकुंडीला आला. अजय सोडून बाकी सगळ्यांना उन्माद चढला होता. त्यांना फार मजा येत होती. त्या भरात अजयचा विचार कुणाच्या गावीही नव्हता. पुन्हा खेळ सुरु झाला. अजय आता घाबरलाच होता. तो लगेचच पडला. आणि मग त्याने भोकाडच पसरले. आता मात्र सगळ्यांना भान आले. खेळ बंद झाला. सगळेजण चिडीचूप झाले. पुढे होऊन ताईंनी अजयला शांत केले.तेव्हा ताईच्या मनात विचार सुरु झाला... ‘एका कुणाला तरी ‘बकरा’ बनवायचे आणि सगळ्यांनी मिळून त्याला छळायचे हा काय प्रकार आहे, कुठून येते ही वृत्ती? दुसऱ्याच्या वेदनेतून आनंद मिळवायचा हा कसला उन्माद...?’

**प्रश्न :-**

१ अजय रडकुंडीला का आला?

२ खेळ का बंद झाला?

३ ताईच्या मनात कोणते विचार आले?

४ ताई मुलांची काय बोलल्या असतील?

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सहावी

---

**विनोद**

संदर्भ :- पु. लं. चे निवडक विनोद

**पहिलवान**

पु. लं. ची आजी विनोदी स्वभावाची होती, परखड व स्पष्ट बोलणारी. आजोबा तेवढेच मऊ आणि भिडस्त होते. त्यांच्याकडे एकदा एक गृहस्थ गप्पा मारायला येऊन बसले. जेवणवेळ टळून गेली ते गृहस्थ काही जाण्याचे नाव काढीत नव्हते आजीने कितीदा तरी त्यांना हाक मारली. एकदाचे ते निघून गेल्यावर आजीने त्या गृहस्थाला खूप नावे ठेवली व बोलली. तेव्हा आजोबा म्हणाले, “अगं काहीतरी काय बोलतेस, ते गृहस्थ म्हणजे एक प्रसिद्ध पहिलवान आहेत.” यावर आजीने षटकार मारला, “मग हे अगोदर नाही का सांगायचे. त्यांच्याकडून माळ्यावरचे कोळशाचे पोते तरी काढून खाली घेतले असते.”

**प्रश्न :-**

१) पु. ल. देशपांडे यांच्या आजीचा स्वभाव कसा होता ?

२) पु. ल. देशपांडे यांच्या आजोबांचा स्वभाव कसा होता ?

३) आजीने त्यांच्याकडे आलेल्या गृहस्थांना नावे का ठेवली ?

४) आजीने ‘षटकार मारला’ असे का म्हटले आहे ?

५) आलेल्या गृहस्थांकडून आजी कोणते काम करून घेणार होती ?

६) वरील उताऱ्यातील विनोदाचा भाग कोणता आहे ते तुमच्या शब्दात लिहा

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्‍या परिषद)

इयत्ता : सहावी

---

**पाककृती**

**संदर्भ :-** झटपट नाश्ता

**सर्व भाज्यांचे थालीपीठ**

**साहित्य -** पालक, चवळी, लाल माठ, मायाळू पातीचा कांदा, अंबाडी, लाल भोपळा, दुधी, १ बटाटा, सुरण, १ रताळे, १ कच्चे केळे, गव्हाचे पीठ, तांदूळ पीठ, रवा, हळद, तिखट, ओली लसूण

**कृती -** सर्व भाज्या किसून एकत्र कराव्यात व त्यात पीठ घालून हळद तिखट, मीठ घालावे. केळीच्या पानावर थापून लोखंडी तव्यावर लावावे. बाजूने तेल सोडावे.

**प्रश्न :-**

**१)** थालीपीठ तयार करण्यासाठी कोणकोणत्या पालेभाज्या वापरायच्या आहेत ?

१) थालीपीठात कोणकोणती कंदमुळे वापरली आहेत ?

२) थालीपीठात कोणकोणत्या पिठांचा वापर केला आहे ?

३) योग्य क्रम लावून वाक्ये पुन्हा लिहा

- तेल सोडावे.
- पानावर थापावे.
- भाज्या पिठात कालवाव्या.
- तव्यावर तेल घालावे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

(विद्या परिषद)

इयत्ता : सहावी

---

**माहितीपर लेख**

**बापूजी**

बापूजींना मुले अतिशय प्रिय असत. मुलांना कोणी रागावले तर त्यांना आवडत नसे. ती रडली तरी बापू चिडत नसत. सन १९२४ मध्ये एके दिवशी माझी ९ -१० महिन्यांची मुलगी त्यांच्या गाडीला खेटून बसली होती. ती त्यांच्या पुढचे कागद उचलू लागली. तेव्हा तिला बाजूस घ्यावयास बापुजींनी फर्माविले नाही. माझ्या पत्नीने त्यांना हरिजन फंडासाठी एक अलंकार दिला होता तोच त्यांनी तिला खेळायला दिला.

पु. रा. लेले

**प्रश्न :-**

१) म. गांधीजींच्या स्वभावाच्या कोणत्या वैशिष्ठ्याचे वर्णन उताऱ्यात आहे ?

२) म. गांधीजींचा स्वभाव स्पष्ट करण्यासाठी कोणते उदाहरण दिले आहे ?

३) वरील उताऱ्याला योग्य शीर्षक लिहा.

४) उताऱ्याचे लेखक कोण आहेत ?